# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०–२५६२१०४९
०२०–२५६२१०५०

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
ई–मेल
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in


संदर्भ क्र.:आयक्यूएसी/ 19 दि :– 15 JAN 2021

**तातडीचे/महत्वाचे**

मा. प्राचार्य,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये व
नॉन–एआयसीटीई अभ्यासक्रमांची महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय – माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) शैक्षणिक वर्ष २०२०–२१ ची माहिती ऑनलाईन पध्दतीने भरणेबाबत.

संदर्भ – १. मा.शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे –१ यांचे पत्र क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२०–२१/९०४५, दि. ३१ डिसेंबर २०२०.
२. अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाचे जा.क्र.आयक्यूएसी/५११, दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सांख्यिकीय माहितीची अत्यंत आवश्यकता असते. सदरची माहिती विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून संकलित करण्यात येते. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०–२१ ची माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) ऑनलाईन पध्दतीने भरण्याची लिंक **दि. १ जानेवारी २०२१** पासून सुरू करण्यात आलेली असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हयामधील तसेच दादरा–नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र व इतर नॉन एआयसीटीई अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांकडून दिनांक ३१ डिसेंबर, २०२० या संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती ऑनलाईन पध्दतीने विविध विवरणपत्रामध्ये मागविण्यात येत आहे. (अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र इत्यादी अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांना माहिती व्यवस्थापन प्रणाली (M.I.S.) लागू नाही)

तथापि, बहुतांष महाविद्यालये/परिसंस्थांनी उक्त माहिती अद्यापपर्यत भरली नसल्याचे निदर्शनास येत आहे.

..२

*यास अनुसरून, प्राप्त आदेशानुसार कळविण्यात येते की, सर्व संबंधित महाविद्यालयांनी उक्त वेब पोर्टलवर तातडीने अचुकपणे माहिती भरावी. भरलेल्या माहितीची मा.प्राचार्यांनी स्वत: पडताळणी करावी. विद्यापीठ संचालनालयाच्या स्तरावर माहितीची पडताळणी करताना त्रुटी आढळल्यास त्याला संबंधित प्राचार्य जबाबदार राहतील याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.*

तसेच पुढे नमूद करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) ऑनलाईन पध्दतीने माहिती भरल्यानंतर विद्यापीठाकडील सर्व प्रकारच्या प्रशासकीय कामासाठी, विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी/अनुदान प्राप्तीसाठी विद्यापीठाकडून ना—हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. महाविद्यालये/परिसंस्थांची कामे जलदगतीने होण्यासाठी, शैक्षणिक वर्ष २०१८—१९ पासून सदरचे ना—हरकत प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू करण्यात आलेली आहे.

सदरची माहिती शासनास अत्यावश्यक असून संबंधित महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने विहित विवरणपत्रांमध्ये त्वरित ऑनलाईन माहिती भरून सहकार्य करावे.

याबाबत महाविद्यालयांना काही अडचणी उद्‌भवल्यास, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथील दूरध्वनी क्रमांक ०२०—२९७०७०९३ तसेच अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ येथील ०२०—२५६२१०४९/५० यांचेशी संपर्क साधावा किंवा naac@unipune.ac.in यावर ई—मेल करावा.

आपला,

Rasve 15/1/2021

(मुं.वि.रासवे)
उपकुलसचिव
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
(अतिरिक्त कार्यभार)

प्रत —

१. मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे — १ यांना माहितीस्तव सादर.
२. विद्यापीठातील संबंधित प्रशासकीय शाखेचे शाखाप्रमुख यांना विनंती करण्यात येते की, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाकडून देण्यात येणारे ना—हरकत प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयाच्या कोणत्याही प्रशासकीय कामकाजासंदर्भातील कागदपत्र/प्रस्ताव कार्यवाहीसाठी स्विकारू नयेत.